क्र.वैमाशा-१४/परीपत्रक/सिलिंग/१० /३८०९
नियंत्रक, वैधमापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य,
मुंबई यांचे कार्यालय, शासकीय कुटीर क्र.७,
फ्री प्रेस जर्नल मार्ग,मुंबई-४०० ०२१
दिनांक- २८ मे, २०१०

**वाचाः-** परिपत्रक क्र.वैमाशा-१४/परीपत्रक/सिलिंग/०९/४१५२ दि.१८ ऑगस्ट, २००९

# परिपत्रक

दि. १८ ऑगस्ट, २००९ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या परीपत्रकानुसार इलेक्ट्रॉनिक डिजीटल स्वरुपातील तोलन उपकरणास मानके वजने व मापे (सर्वसाधारण) नियम, १९८७ व मॉडेल ॲप्रूव्हल मधील तरतुदीनुसार सिलिंग करण्याबाबत निर्देशित करण्यात आले आहे.

वरील परिपत्रकाबाबत उत्पादकांच्या व दुरुस्तकारांच्या अभिवेदनावरील सुनावणी नियंत्रक, वैधमापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यासमोर घेण्यात आली. सिंलिंग केलेल्या इलेक्ट्रॉनिक उपकरणात बिघाड झाला असता कोणती प्रकिया अवलंबवावी असा मुद्दा सुनावणीमध्ये उपस्थित करण्यात आला होता. याबाबत सविस्तर चर्चा करुन असे निर्देश देण्यात येत आहेत कि, सिलींग केलेल्या इलेक्ट्रॉनिक उपकरणात बिघाड झाल्यास उपयोगकर्त्याने अथवा त्यांचे प्रतिनिधीने सदर उपकरणाच्या दुरुस्तीसाठी सिल तोडण्याची परवानगी स्थानिक निरीक्षकाकडून घेणे आवश्यक आहे. सदर परवानगीसाठी उपकरणाच्या उत्पादकाचे नांव, अनुक्रमांक, क्षमता, वर्ग व ई-व्हॅल्यू इत्यादीच्या तपशिलासह स्थानिक निरीक्षकाकडे अर्ज करुन पोच घ्यावी. या अर्जाची पोच म्हणजेच सिल तोडण्यास परवानगी समजण्यात येईल. मात्र सिल तोडण्यात आलेल्या काट्याचा वापर निरीक्षकाकडून सिलिंगसह पुनर्पडताळणी व फेरमुद्रांकन केल्यानंतरच करावा. याबाबत उल्लंघन आढळल्यास नियमानुसार उपयोगकर्त्यावर कारवाई करण्यात येईल.

काही अपरिहार्य कारणांमुळे स्थानिक निरिक्षकाशी ७ दिवसात संपर्क होऊ शकला नाही, तर संबधित जिल्हा सहायक नियंत्रक, विभागिय उपनियंत्रक किंवा नियंत्रण कक्ष मुख्यालय यांचेशी ई-मेल द्वारा किंवा पत्राद्वारे वरील तपशिलासह संपर्क साधावा यांपैकी एकाचीही पोच मिळाल्यासच संबंधित उपकरणाचे दुरुस्तीसाठी सिल तोडण्याची परवानगी समजण्यात येईल व उपयोगकर्त्याला किंवा त्याच्या प्रतिनीधीला सिल तोडता येईल. मात्र सिल तोडल्यानंतर आवश्यक दुरुस्तीनंतर संबंधित निरीक्षक, वैधमापन शास्त्र यांच्याकडून पुनर्पड्ताळणी व फेर-मुद्रांकन करुन सिलिंग केल्याशिवाय सदरचे उपकरण वापरणे अधिनियमातील तरतुदीनुसार गुन्हा होतो, याची जाणीव संबंधित उपयोगकर्त्यास करुन देण्यात यावी.

अंकुश-धनविजय २८।५।२०१०

( डॉ. अंकुश धनविजय)
नियंत्रक, वैधमापन शास्त्र,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

१) उपनियंत्रक, वैधमापन शास्त्र,---------- विभाग
२) सहायक नियंत्रक, वैधमापन शास्त्र, ------- जिल्हा. ३) निरीक्षक, वैधमापन शास्त्र,-------विभाग.